श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे
# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र
फेब्रुवारी २०२४ | वर्ष १२ विशेषांक – २ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | पाने १२

# 'एसव्हीजेसीटी'चे 'कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र'




*वात्सल्य ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांची पहिली भेट – डावीकडून : सौ. अमिता राहटे, डॉ. अस्मिता जाधव, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. ज्योती अय्यर, श्री. गिरीश कुलकर्णी, श्री. श्रीकांत खेर, डॉ. अर्चना चौधरी, श्री. अजित पाटील, श्री. श्रीकांत जोशी (१० फेब्रुवारी २०२३)*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टने १ फेब्रुवारी १९९६ रोजी डेरवण येथे आपल्या समाजकार्याचा एक भाग म्हणून साठ रुग्णशय्या असलेले सुसज्ज रुग्णालय सुरू केले. त्यानंतर १९९८ साली जून महिन्यात डेरवणसारख्या लहानशा गावात इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करून ट्रस्टने एका अनोख्या प्रयोगाला प्रारंभ केला. खेडेगावात इंग्रजी माध्यम हा पंचवीस वर्षांपूर्वी खरोखरच अभिनव प्रयोग होता. ग्रामीण भागातील मुलांना प्राथमिक स्तरावर इंग्रजी माध्यम उपलब्ध झाल्याने स्पर्धात्मक वातावरणाला ती आत्मविश्वासाने सामोरी जाऊ लागली. दोन वर्षांतच ट्रस्टने दि. १ फेब्रुवारी २००१ रोजी 'समर्थ नर्सिंग स्कूल'ची सुरुवात केली आणि प्रथम नर्सिंगचे बेसिक कोर्स शिकविण्याची सोय असलेल्या या शाळेत आता नर्सिंगचे पदव्युत्तर शिक्षणही मिळते. रुग्णालयाला त्यामुळे प्रशिक्षित परिचारिका तर मिळू लागल्याच, पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे या नर्सिंग स्कूलमधून ग्रामीण भागातील अनेक मुलींना उत्तम प्रशिक्षण मिळाले आणि त्यांना मोठमोठ्या शहरी रुग्णालयात तसेच सरकारी आरोग्य खात्यात नोकऱ्या मिळून त्या स्वयंपूर्ण झाल्या. रुग्णालय जसजसे वाढू लागले तसतसे रुग्णालयातील विविध तांत्रिक जबाबदाऱ्या सांभाळणारे मनुष्यबळही मिळणे गरजेचे झाले. त्यासाठी फोरेन्सिक मेडिकल टेक्निशिअन, एन्डोस्कोपी टेक्निशिअन, मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशिअन, डायलिसिस टेक्निशिअन, ऑपरेशन थिएटर टेक्निशिअन, अशा अनेक तंत्रकुशल माणसांची गरज निर्माण झाली. त्या वेळी ट्रस्टने एक महत्त्वाचे धोरण आखले की या परिसरातील मुलांनाच जर आपण हे तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून दिले तर रुग्णालयाची गरज तर भागेलच, पण त्याचबरोबर ग्रामीण युवकांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील. त्यातून ट्रस्टने विविध पॅरामेडिकल कोर्सेस शिकविणारे 'कॉलेज ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज' सुरू केले. शिवाय 'बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन' आणि 'सायकॉलॉजिकल हेल्थ ॲन्ड बिहेविअरल सायन्स' हे दोन पदवी अभ्यासक्रमही मुंबई विद्यापीठाच्या मान्यतेने सुरू केले. यथावकाश 'भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय' आणि 'फिजिओथेरपी कॉलेज'ही ट्रस्टने सुरू केले.

ट्रस्टचे हे चौफेर कार्य सजगपणे समाजसेवेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मुंबईच्या 'वात्सल्य ट्रस्ट'च्या लक्षात आले नसते तरच नवल! 'वात्सल्य ट्रस्ट' ही सेवाभावी संस्था अनाथ, निराधार




*उद्‌घाटनप्रसंगी डावीकडून - डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. ज्योती अय्यर, मा. आमदार श्री. शेखरजी निकम, श्री. केतन पवार, श्री. अशोकराव जोशी आणि श्रीमती सावित्री होमकळस (माजी नगराध्यक्षा, चिपळूण) (१ एप्रिल २०२३)*

आणि वंचित मुलांसाठी मोठे काम करीत आहे. अशा मुलांना तसेच उपेक्षित, अकुशल तरुणांना आधार देऊन सक्षम बनविणे यासाठी ही संस्था अखंड कार्यरत आहे. या संस्थेच्या श्री. गिरीश कुलकर्णी, श्री. श्रीकांत खेर, डॉ. अर्चना चौधरी, श्री. अजित पाटील, श्री. श्रीकांत जोशी आदी पदाधिकाऱ्यांनी दि. १० फेब्रुवारी २०२३ रोजी डेरवणला भेट देऊन ट्रस्टच्या कार्याची पाहणी केली आणि अकुशल तरुण-तरुणींसाठी काही कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्यासंबंधी एक योजना उभय संस्थांच्या चर्चेतून आकाराला आली आणि अगदी अल्पावधीत सर्व योजनेचे तपशील ठरून शनिवार, दि. १ एप्रिल २०२३ रोजी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट आणि वात्सल्य ट्रस्ट, मुंबई यांनी संयुक्तपणे सुरू केलेल्या 'नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन' प्रमाणित 'कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रा'चे उद्‌घाटन सह्याद्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष, मा. आमदार श्री. शेखरजी निकम (चिपळूण-संगमेश्वर मतदार संघ) यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या केंद्रात दहावी उत्तीर्ण मुलामुलींसाठी टेलरिंग आणि फॅशन डिझायनिंग (बेसिक आणि ॲडव्हान्स्ड अभ्यासक्रम), ब्युटी पार्लर (बेसिक आणि ॲडव्हान्स्ड अभ्यासक्रम), संगणक प्रशिक्षण आणि जनरल ड्युटी असिस्टंट असे वेगवेगळ्या कालावधीचे चार अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. या प्रशिक्षणासाठी माध्यमिक शाळेच्या नव्या इमारतीत सुसज्ज असे चार कक्ष स्थापन करण्यात आले.

उद्‌घाटन समारंभाच्या वेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. ज्योती अय्यर म्हणाल्या, ''प्राथमिक शिक्षण आता सर्वांना सहजपणे उपलब्ध आहे, पण त्यानंतर काय करायचे हाच सर्वांपुढे प्रश्न असतो. पैसे असतील त्यांना शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध होतात. पण किमान नोकरी मिळण्यासाठी उपयुक्त ठरतील असे अभ्यासक्रम सहजपणे उपलब्ध होत नाहीत. थिअरीचे शिक्षण मिळाले तरी प्रॅक्टिकलचे ज्ञान मिळणे हेही महत्त्वाचे आहे. त्यासाठी दीर्घ मुदतीच्या कोर्सऐवजी कमी कालावधीचे कोर्स जे काही कौशल्य शिकवतील आणि ज्याचा उपयोग स्वत:चा व्यवसाय करण्यासाठी अथवा नोकरी मिळविण्यासाठी होईल, असे कोर्स आम्ही सुरू करीत आहोत. याची फी अल्प आहे आणि अधिकृत सरकारी मान्यता असलेले हे




*डॉ. ज्योती अय्यर आपले विचार व्यक्त करताना*




*श्री. गिरीश कुलकर्णी – वात्सल्य ट्रस्टविषयी माहिती देताना*



*प्रमुख विश्वस्त श्री अशोकराव जोशी यांची कौशल्य विकास केंद्राला भेट*

कोर्स आपण मिळविलेल्या कौशल्याचे प्रमाणपत्रही देणार आहेत. शिवाय जॉब-कार्डही देण्यात येणार आहे. बाहेरगावच्या मुलांसाठी येथे अल्प शुल्कात निवासव्यवस्थाही करण्यात आली असून हे कोर्स अल्प मुदतीत 'क्रॅश कोर्स'च्या स्वरूपातही करता येतील.'' सुमारे ३५-४० विद्यार्थ्यांनी नावे नोंदविली असून सोमवारी तीन एप्रिलपासून हे अभ्यासक्रम सुरू होतील असे सांगून परिसरातील मुले याचा चांगला फायदा घेतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

त्याच वेळी वात्सल्य ट्रस्टचे कार्यकारी अध्यक्ष श्री. गिरीश कुलकर्णी आपली भूमिका मांडताना म्हणाले, 'वात्सल्य ट्रस्टने संगणक प्रशिक्षण, शिवणकाम अशी सुमारे ५० केंद्रं महाराष्ट्रात वेगवेगळ्या संस्थांच्या सहकार्याने सुरू केली आहेत. पण तीन-चार महिन्यांपूर्वी जेव्हा मी प्रथमच डेरवणला या ट्रस्टमध्ये आलो तेव्हा येथे एवढ्या व्यवस्थितपणे एवढे मोठे काम सुरू असेल याची मला कल्पना नव्हती. या संस्थेशी जोडलं जाणं हा आम्ही आमचा सन्मान समजतो. गेल्या पंधरा दिवसात येथील या चार कोर्ससाठीची व्यवस्था इथल्या लोकांनी एवढ्या झपाट्याने उभी केली त्याचं मला विशेष कौतुक वाटत आहे.'

वात्सल्य ट्रस्टची माहिती देताना ते म्हणाले, ''वात्सल्य ट्रस्टची स्थापना 'अर्भकालय' म्हणून १९८३च्या फेब्रुवारीमध्ये झाली. आजवर ट्रस्टने १४०० मुलांचे दत्तकविधान केले असून ही मुले चांगल्या घरांमध्ये वाढत आहेत. सानपाड्याच्या बालिकाश्रमात पन्नास निराधार मुली (सहा ते अठरा वयोगटातील) वाढत आहेत. १८ वर्षांवरील दहा मुली उच्च शिक्षण घेत आहेत. पंधरा महिलांसाठी एक वृद्धाश्रम ट्रस्टतर्फे चालविला जातो. कांजुरमार्ग, अलिबाग आणि सानपाडा येथे आम्ही एकूण अडीचशे दिव्यांग मुलांसाठी उपचार केंद्र चालवतो. ऑक्युपेशनल, स्पीच, फिजिओ अशा थेरपीज तेथे दिल्या जातात. काउन्सिलिंग केले जाते. २००६पासून परिचारिका आणि संगणक प्रशिक्षण देणे सुरू झाले. आमच्या असं लक्षात आलं की अनेक ठिकाणी 'एनजीओज' मोठ्या प्रमाणावर आणि उत्तम काम करीत आहेत. आपण त्यांच्याशेजारी उभं राहिलं तर हे कौशल्य प्रशिक्षणाचं काम गावागावात पोहोचेल. आणि मला सांगायला आनंद वाटतो की अडीच हजार मुलांनी गेल्या एका वर्षात आमच्या केंद्रातून असे प्रशिक्षण घेतले. यावर्षी आम्ही 'नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन'चे ट्रेनिंग पार्टनर झालो आहोत. त्यामुळे त्यांचे सर्टिफाईड कोर्सेस आम्ही आता चालवतो. त्याचा लाभ मुलांनी घ्यावा आणि स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे प्रयत्न करावेत. प्रशिक्षण घेऊन स्वस्थ न बसता त्यांनी नोकरी वा व्यवसायाद्वारे अर्थार्जन करावे.



*टेलरिंग आणि फॅशन डिझायनिंग – प्रात्यक्षिक*



*टेलरिंग आणि फॅशन डिझायनिंग – सर्वाधिक प्रतिसाद मिळालेला अभ्यासक्रम*



*टेलरिंग आणि फॅशन डिझायनिंग - एम्ब्रॉयडरीसुद्धा शिकविली जाते*



*टेलरिंग आणि फॅशन डिझायनिंग - प्रशिक्षणार्थीने शिवलेला परकर-पोलका*

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. शेखरजी निकम या प्रसंगी बोलताना म्हणाले, ''... खेडेगावातील गरजू तरुण, तरुणी आणि महिलांनाही स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रशिक्षित करण्यात आणि पुढे रोजगार निर्मिती करण्यात उपयुक्त असा हा कार्यक्रम दोन्ही ट्रस्ट संयुक्तपणे करीत आहेत. विठ्ठलराव जोशी ट्रस्ट जेव्हा एखादा कार्यक्रम हाती घेतो, तेव्हा तो उत्तम तऱ्हेने पूर्ण होणार याची खात्री असते. याचे कारण म्हणजे, येथील इन्फ्रास्ट्रक्चर आणि श्रीकाकामहाराजांची शिस्त, त्यांचा स्वच्छतेविषयीचा मनापासूनचा आग्रह, हाती घेतलेले काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक तो खर्च करण्याची तयारी. त्यामुळे वात्सल्य ट्रस्टच्या कुलकर्णीसाहेबांना मी नक्की आश्वस्त करीन की हे कोर्स नक्की उत्तम तऱ्हेने चालतील आणि येथे प्रशिक्षण घेतलेले विद्यार्थी दोन-चार वर्षांत आपला व्यवसाय ताकदीने करू शकतील.

येथे चार प्रकारचे अभ्यासक्रम आहेत ते महत्त्वाचे आहेत. नर्सिंग असिस्टंट हा महत्त्वाचा कोर्स आहे. डॉक्टर उपलब्ध नसताना त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो. अशा छोट्या यंत्रणा सर्वच क्षेत्रात वेळप्रसंगी उपयुक्त ठरतात. बाकी शिकणे हे वैयक्तिक ज्याच्या-त्याच्यावर अवलंबून आहे. परिसरातील महिला-भगिनी, युवकांनी याचा विचार करून शिक्षण घेऊन स्वयंपूर्ण होणे आवश्यक आहे.

प्रशिक्षणार्थींना मी सांगेन की कोणतेही काम करणे अप्रतिष्ठेचे समजू नका. बुटपॉलिश करणार असाल तर त्यातही उच्चतम कौशल्य मिळवा. तरच रोजगाराची समस्या पुढील काळात सुटू शकेल. 'कौशल्य विकास' ही डॉ. अब्दुल कलाम यांची कल्पना. ती शिक्षण, शेती, संरक्षण, उद्योग अशा सर्वच क्षेत्रांना केंद्रस्थानी ठेवणारी आहे. शिक्षण हा पाया आहे. पण एखाद्या क्षेत्रातले ज्ञान हे प्रात्यक्षिकाद्वारे मिळाले तर ते अधिक सखोल असते. आजची मुलं हुशार आहेत, स्मार्ट आहेत, फास्ट आहेत. त्याना केवळ जोड देण्याची गरज आहे आणि ते काम अशा कोर्सेसच्या माध्यमातून होत आहे. ज्यांना दहावीनंतर पुढे शिकणे शक्य नाही त्यांनी अशा कोर्सेसमधून कौशल्य प्राप्त करावे. फॅशन डिझायनरही लाखो रुपये मिळवतो! पण त्यासाठी त्याने केलेले कष्टही माहीत करून घेतले पाहिजेत.

मी काकामहाराजांना आणि श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टला मनापासून धन्यवाद देतो की आपल्या मतदार संघात तरुण -तरुणींना एक उत्तम संधी त्यांनी वात्सल्य ट्रस्टच्या साथीने उपलब्ध करून दिली आहे. त्याचा उपयोग कसा करून घ्यायचा हे प्रत्येकाने व्यक्तिश: ठरवायचे आहे. मात्र एक मार्ग दाखविण्याचे काम या उभय ट्रस्टनी केले आहे. शिवाय येथे मिळणारे कौशल्य आयुष्यभर आपली



*प्रशिक्षणार्थी मुलींकडून तयार करण्यात आलेल्या वस्तू - विविधरंगी पाउच*



*प्रशिक्षणार्थी मुलींकडून तयार करण्यात आलेल्या वस्तू - भोजन थाळीखाली ठेवण्यासाठी आकर्षक केळीच्या पानाच्या आकाराचे वस्त्र*

साथ करणार आहे. कम्प्युटर शिकला आणि व्यवसाय दुसरा केला म्हणून ते शिक्षण काही फुकट जात नाही. पूर्वी लिहिता-वाचता येणाऱ्याला साक्षर म्हणत. आता कम्प्युटर येत नसेल तर त्याला साक्षर समजले जात नाही. टेलरिंगचा उपयोग घरात नेहमीच होत असतो.''

अत्यंत उत्साहात या कोर्सेसना सुरुवात झाली. तरुणींचा प्रतिसाद अत्यंत समाधानकारक आहे. शिवणकामाच्या अभ्यासक्रमाला सर्वात जास्त प्रतिसाद मिळत आहे.

आता हे अभ्यासक्रम सुरू होऊन वर्ष पूर्ण होत आले आहे. या कालावधीत एकूण दीडशे मुला-मुलींनी या अभ्यासक्रमांचा लाभ घेतला आहे. तरुण मुलींकडून मिळणारा प्रतिसाद अत्यंत समाधानकारक आहे. या अभ्यासक्रमांच्या संचालिका डॉ. ज्योती अय्यर म्हणाल्या,'डेरवण कोहोर्ट'च्या निमित्ताने अनेक किशोरवयीन मुली रुग्णालयाशी जोडल्या गेल्या. त्यांच्या आरोग्य तपासणीच्या निमित्ताने त्यांचे रुग्णालयात वारंवार येणे होऊ लागले. त्यांच्या आरोग्यविषयक आणि अन्य समस्यांविषयी अभ्यास करताना या समस्यांची आर्थिक बाजूही संस्थेच्या लक्षात आली. आर्थिकदृष्ट्या त्यांना स्वयंपूर्ण करणे हाही त्यांच्या समस्या सोडविण्याचा आणि त्यांना सर्वार्थाने सक्षम बनविण्याचा एक मार्ग आहे हे लक्षात आल्यावर त्यांना कोणत्या मार्गाने स्वयंपूर्ण करता येईल याविषयी विचारमंथन सुरू असतानाच मुंबईच्या वात्सल्य ट्रस्टने फेब्रुवारी २४मध्ये डेरवणला येऊन येथे सुरू असलेल्या विविध कामांची प्रत्यक्ष पाहणी केली आणि त्याच वेळी त्यांनी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टसोबत काही काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती.

डेरवण येथे कोणते अभ्यासक्रम सुरू करता येतील या विषयी विचार करताना, तरुण मुलींना कोणते अभ्यासक्रम आवडतील याविषयी त्यांच्याशीच संवाद साधल्यावर बहुसंख्य (सुमारे ३०-४०%) मुलींनी 'शिवणकामा'ला पसंती दर्शविली. तेव्हा या केंद्रात दहावी उत्तीर्ण मुलामुलींसाठी टेलरिंग आणि फॅशन डिझायनिंग (बेसिक आणि ॲडव्हान्स्‌ड अभ्यासक्रम), ब्युटी पार्लर (बेसिक आणि ॲडव्हान्स्‌ड अभ्यासक्रम), संगणक प्रशिक्षण आणि जनरल ड्युटी असिस्टंट असे वेगवेगळ्या कालावधीचे चार अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. हे सर्व अभ्यासक्रम सवलतीच्या दरात म्हणजे केवळ २००० रुपयात शिकवले जातात. १३० किंवा १७० तासांचा कालावधी यासाठी ठरविलेला आहे.

वेगवेगळ्या कालावधीचे हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर प्रशिक्षणार्थींची परीक्षा वात्सल्य ट्रस्ट आणि 'एसव्हीजेसीटी' संयुक्तपणे घेतात आणि उत्तीर्ण विद्यार्थ्यांना 'एनएसडीसी' प्रमाणपत्र देते. हे प्रमाणपत्र संपूर्ण देशभर ग्राह्य धरले जातेच, शिवाय जगभरातील सुमारे २३ देशातही हे प्रमाणपत्र स्वीकारले जाते.

आमच्या केंद्रातून अभ्यासक्रमपूर्ण करून बाहेर पडलेल्या मुलींनी केवळ नोकरी करू नये तर काहींनी स्वत:चा काही व्यवसाय सुरू करून स्वावलंबी व्हावे या उद्देशाने त्यांना दिशा दाखविण्यासाठी केंद्रातर्फे इच्छुक मुलींना दरवाज्यावर लावण्यासाठी शोभिवंत तोरणे, एन्व्हलप, बॅगा, बांगड्या, कर्णभूषणे आदी वस्तू बनविण्याचे आणि त्या वस्तूंची विक्री करण्याचे तंत्र आणि प्रशिक्षण दिले आहे. याची सुरुवात अगदी 'यू-ट्युब'वर पाहून करण्यात आली. परंतु श्रीकाकामहाराजांनी पुण्याच्या सौ. प्रज्ञा शिंत्रे यांना आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी पाठविले आणि मग या उपक्रमाला एक गती आणि शिस्त आली. आता सात मुलींनी हे कौशल्य आत्मसात केले आहे. त्यांना प्रतिमाह रु. ५०००/-ची कमाई होते.''

श्वेताली पोकळे या येथे फॅशन डिझायनिंग शिकवितात. सुमारे ४५ महिलांना त्यांनी आत्तापर्यंत टेलरिंग आणि फॅशन डिझायनिंग शिकविले आहे. त्या म्हणाल्या, येथे येणाऱ्या काही महिला या प्रौढ गृहिणी असतात. पाच-दहा वर्षांत त्यांनी हातात पेनही धरलेले नसते. पण त्यांना शिकविताना त्यांचा आत्मविश्वास वाढेल किंवा ''आता हे या वयात आपणाला जमेल का?'' असे त्यांना वाटणार नाही अशा तऱ्हेने शिकवावे लागते. खुद्द मलाही





*प्रशिक्षणार्थी मुलींकडून तयार करण्यात आलेल्या वस्तू -*
*बांगड्या, ज्वेलरी, टेबल मॅट, पर्यावरणपूरक कापडी पिशव्या, मोबाइल पाउच, पोथी आवरण इ.*




*जनरल ड्युटी असिस्टंट कोर्स- लेक्चर*



*जनरल ड्युटी असिस्टंट कोर्स- रक्तदाब तपासणी प्रात्यक्षिक*

चारचौघात वावरताना आत्मविश्वास वाटत नसे, मोकळेपणाने आपले विचार व्यक्त करता येत नसत. पण येथे आल्यामुळे आता मलाही एक आत्मविश्वास वाटू लागला आहे. 'यू-ट्युब'वर पाहून तोरणे बनविताना प्रथम आम्ही खूप चुका केल्या, परंतु शिंत्रेमॅडमनी आम्हाला नीट शिकविल्यावर आता आमचे काम खूपच सुधारले आहे. आमच्या तोरणांना खूपच मागणी आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुलींची आवड लक्षात घेऊन अभ्यासक्रमातील त्या संबंधित गोष्टी आम्ही त्यांना आधी शिकवितो. त्यामुळे त्या लवकर प्रावीण्य मिळवितात आणि मग 'आपणाला हे चांगले जमते आहे' या आत्मविश्वासातून संपूर्ण अभ्यासक्रम त्या पूर्ण करतात. आमच्या वर्गातील एका मुलीने ॲडव्हान्स्ड कोर्स पूर्ण केला आहे. बाकी सर्वांनी बेसिक अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. त्यातील एक मुलगी तर आता तिच्या गावात अन्य मुलींना शिकविते. शिवाय ती येथेही पूर्णवेळ काम करते. एक शिवणमशिन घेतले आणि अगदी घरचे कपडे आपले आपण शिवले तरी घरचे पैसे वाचविले जातात आणि पैसे वाचविणे म्हणजेच पैसे मिळविणे आहे.''

प्राची नरोटे ही असुर्डे या डेरवणजवळच्या गावातील मुलगी प्रथम टेलरिंगसाठी आली आणि तो कोर्स पूर्ण झाल्यावर आता ती तोरणे बनविण्यासाठीही पूर्णवेळ काम करते. आपले अनुभव सांगताना ती म्हणाली, ''...खूप चांगला अनुभव होता. खूप काही शिकायला मिळालं. काय करायचं असतं, वस्तू तयार कशा करायच्या हे शिकायला मिळालं. पहिला पगार मिळाल्यावर खूप आनंद झाला. जेव्हा हातात आपण स्वतः कमावलेले पैसे येतात, तेव्हा खूप छान वाटतं. मॅडम आधी स्वतः कटिंग वगैरे सगळं करायच्या. आता आम्हीसुद्धा कटिंग वगैरे सगळं करतो.''

अस्मिता दत्तात्रेय बिडामकर ही मुलगी बारावी झाल्यावर काहीतरी किरकोळ खासगी नोकरी करीत होती. या कोर्सविषयी समजल्यावर ती येथे येऊ लागली. ती म्हणाली, ''दीड महिना झाला आहे. मॅडम आम्हाला ट्रेनिंग वगैरे देत आहेत. आत्ता आम्ही फ्रॉक, ब्लाउज, ड्रेस वगैरे शिकत आहोत. एम्ब्रॉयडरी पण आम्हाला शिकवत आहेत. मी दोन एम्ब्रॉयडरी स्वतः तयार करून इथे क्लासला भेट म्हणून दिल्या आहेत.''

संगमेश्वरजवळील कडवई या गावातील सौ. अस्मी खातू या गृहिणी आपल्या मुलाला 'एसव्हीजेसीटी'च्या इंग्लिश मिडियम शाळेत, नर्सरीत सोडण्यासाठी एवढ्या दुरून म्हणजे सुमारे २०-२५ कि.मी. अंतरावरून येतात. त्याची शाळा सुटेपर्यंत त्या तेथेच थांबून राहात असत. या कोर्सेससंबंधी समजल्यावर त्यांनी टेलरिंगच्या




*जनरल ड्युटी असिस्टंट कोर्स- रुग्णशय्या तयार करण्याचे प्रात्यक्षिक*



*जनरल ड्युटी असिस्टंट कोर्स- शिक्षण पूर्ण होताच वालावलकर रुग्णालयात नियुक्ती मिळालेल्या पहिल्या बॅचच्या विद्यार्थिनी*



*ब्युटी पार्लर कोर्स– प्रशिक्षणार्थी*



*ब्युटी पार्लर कोर्स– प्रात्यक्षिकावर अधिक भर*

कोर्ससाठी नाव नोंदविले. त्या म्हणतात, ''माझं बी.ए.पर्यंत शिक्षण झालेलं आहे. आम्हाला या कोर्सची माहिती झाली तेव्हा मी ॲडमिशन घेतली. या सगळ्या मॅडमनी मला एवढं चांगलं सहकार्य केलं की मला साडेअकरा वाजेपर्यंत जेवढं शिकायला मिळेल, शिवायला मिळेल तेवढं मला दाखवतात. मी सकाळी लवकर येते, पण साडेअकरा वाजले की मी मुलाला घेऊन घरी जाते. पण त्या मला असं कधी म्हणाल्या नाहीत की तुझे तास पूर्ण होत नाहीत. किंवा तू आता लगेच परीक्षा दे. त्या म्हणाल्या की जोपर्यंत तुम्हाला हे जमत नाही तोपर्यंत तुम्ही परीक्षा देऊ नका. माझा हा कोर्स चालू झाल्यापासून वेळेचा खूपच चांगला उपयोग झाला आणि यांनी सगळ्यांनी मला खूप छान मदत केली. मला शिवणक्लासची आवड आहे. घरात मशिनपण आहे. पण घरी बिझनेस असल्यामुळे मला शिवणकाम करायला वेळ मिळायचा नाही. पण आता मी स्वत:चा गाऊन, ड्रेस व मुलीचा फ्रॉक शिवू शकते. माझी अशी वेळेची अडचण असताना शिकणे अवघड होते. पण हे सर्व यांच्या सौजन्यामुळे शक्य झालंय.''

रोशनी पेडामकर ही मुलगी ब्युटी पार्लर कोर्स करत आहे. ती आपले विचार व्यक्त करताना म्हणाली, ''बारावी पूर्ण झाल्यानंतर मी पुण्याला जॉब करत होते. माझी पार्लर करण्याची आधीपासूनच इच्छा होती. ऑफिस करून पार्लरचा कोर्स करायला मला जमत नव्हतं. मग मी गावी परत आले. आमच्या गावच्या ज्या मुली (कोहर्टच्या) फॉलो-अपसाठी हॉस्पिटलला येत होत्या त्यांच्यासोबत मी क्लासेस बघायला आले होते. मला छान वाटलं. राहण्याची सोयपण आहे. आता मी इथे हॉस्टेलला राहते. गावाहून रोज जाऊन येऊन करणे मला परवडणार नाही. माझ्या बहिणीला टेलरिंगची आवड होती. मग मी तिला म्हंटलं की तू टेलरिंग कर, मी पार्लर शिकते. येथे मेहंदीचे क्लासेससुद्धा घेतात. मी थोडीथोडी मेहंदी वगैरे शिकत आहे. मॅडमपण सगळ्यांना छान शिकवतात. समजून घेतात. मी आत्ता बेसिक करत आहे. माझा पुढे असाही विचार आहे की ॲडव्हान्स कोर्स पण करावा.

हॉस्टेल पण खूप छान आहे. सकाळी लवकर उठतो. आंघोळ वगैरे झाल्यानंतर सकाळचा नाश्ता असतो. दुपारचं जेवणही छान असत. संध्याकाळी नाश्ता, रात्रीचं जेवणही छान असतं. वेळपण मिळतो आणि दुपारीही आम्ही भरपूर प्रॅक्टिस करतो. संध्याकाळी पाच-साडेपाचपर्यंत इथे असतो. हे सर्व हॉस्टेलच्या सोयीमुळे शक्य होते.''

तन्वी राजेंद्र शिर्के ही मुलगी म्हणाली, ''मी छोट्या गावातून आलेली आहे. माझं ब्युटी पार्लर झालेलं आहे. मी इथे



*ब्युटी पार्लर कोर्स– एकमेका साह्य करू*



*ब्युटी पार्लर कोर्स– प्रशिक्षणार्थींनी केलेल्या केशरचना*






*यु.के. मेडिकल टीमच्या महिला सदस्यांनी कौशल्य विकास केंद्राला भेट देऊन प्रोत्साहन दिले*

आता अप्रेंटिसशिपसाठी येते. मला पार्लरमध्ये खूप आवड होती. मी मॅडमकडून खूप चांगल्या प्रकारे शिकले. मला आता खूप आत्मविश्वास वाटतो. मॅडमनी प्रत्येक गोष्ट व्यवस्थित शिकवली. एखादे प्रॉडक्ट वापरल्यावर काय होईल, एखादे प्रॉडक्ट का वापरू नये, याचे प्रत्येक डिटेल्स सांगितलेले आहेत. आता मी अगदी व्यवस्थित, आत्मविश्वासाने काम करू शकते.''

वैष्णवी विनोद आंबेकर या ब्युटी पार्लर हा विषय शिकवितात. आपले अनुभव सांगताना त्या म्हणाल्या, ''मी रत्नागिरी आय.टी.आय.मधून पूर्ण एक वर्षाचा कोर्स केला. त्याच्यानंतर चार वर्षं अप्रेंटिसशिप केली. २०११मध्ये कोर्स पूर्ण झाला. तेव्हापासून मी अखंडपणे ब्युटी पार्लर व्यवसायामध्ये आहे. माझ्याकडे गव्हर्नमेंट सर्टिफिकेट आहे. इथे येण्याचा अनुभव पूर्ण वेगळाच आहे. मला शिकविण्याबद्दल काहीच माहिती नव्हतं. मी फक्त पार्लरमध्ये काम केलं. स्वतःचं पार्लर पण मी चालवत होते. त्याच्यानंतर काही प्रॉब्लेम झाला म्हणून ते मी बंद केलं. मग माझ्या होम सर्विसेस वगैरे चालू होत्या.

येथे मला 'ज्योती मॅडम' भेटल्या. त्यांनी मला इथे नेमणूक दिली. इथे काम सुरू केल्यावर माझ्यामध्ये जी भीती होती ती पूर्णपणे गेली आणि मी मुलींना चांगलं शिकवू शकते. ही माझ्यामध्ये जी कला होती ती बाहेर आली आणि हे फक्त मॅडममुळे झालेलं आहे.

माझ्या आत्ता तीन बॅच बाहेर पडल्या. त्याच्यातल्या पहिल्या बॅचमध्ये दहा मुली होत्या. दुसऱ्या बॅचमध्ये १७ मुली होत्या आणि तिसऱ्या बॅचमध्ये आठ आणि आता चौथी आठ मुलींची बॅच चालू आहे. पहिल्या बॅचमधून ज्या मुली बाहेर पडल्या त्या स्वतःहून घरातूनपण होम सर्विस देतात. काही मुली जॉबलापण लागल्यात. काही मुली कॉलेज करून सर्विसपण देतात. तिसऱ्या बॅचमध्ये दोन मुली होत्या त्या आता जॉबला लागल्या.

एक अनुभव असा होता की तिसऱ्या बॅचची एक मुलगी होती, तिला ऐकायला काहीच येत नव्हते. ती माझ्यासाठी एक 'टास्क' होता, एक परीक्षा होती माझी. तिला शिकवताना खूप छान अनुभव आला आणि तिने उत्तम प्रकारे हे कौशल्य आत्मसात केले.

मी जेव्हा एक एप्रिलला जॉईन झाले तेव्हा आम्हाला 'वात्सल्य ट्रस्ट'ने आठ दिवसांसाठी मुंबईला ट्रेनिंगला बोलावलं. तिथं सविता पेठे म्हणून एक मॅडम आहेत, त्यांनी मला छान ट्रेनिंग दिलं आणि वात्सल्य ट्रस्टने आमची एवढी काळजी घेतली की सकाळी ट्रेनिंग सेंटरला जाताना ट्रेनमध्ये बसवण्यापासून ते परत येईपर्यंत एक महिला आमच्यासोबत असायच्या. सकाळचा नाश्ता अगदी वेळेवर असायचा. दुपारचापण टिफिन आमच्यासोबत त्या





*वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील महिला मेळाव्यात कौशल्य विकास केंद्र आणि तेथील अभ्यासक्रम यांचे महत्त्व सांगताना*






*माहिती तंत्रज्ञान अभ्यासक्रमालाही वाढता प्रतिसाद मिळत आहे*

द्यायच्या. त्या टिफिनसोबत भाजी-चपाती तर असायचीच पण त्याच्यासोबत एक फळसुद्धा द्यायच्या.

सविता पेठे मॅडम या नामवंत ब्युटिशिअन आहेत. मुंबईमध्ये त्या ब्युटी असोसिएशनच्या चेअरमन होत्या. एखाद्या लहान बाळाला जसं आपण खायला शिकवतो किंवा चालायला शिकवतो त्याप्रमाणे वात्सल्य ट्रस्टने मला शिकवलं. अजूनही आम्ही त्यांच्या संपर्कात आहोत. त्या व्हॉइस कॉलवर अथवा झूम मीटिंगवर मार्गदर्शन करतात. त्यांनी मला खूप सहकार्य केलं.

माझी अर्धी भिती त्यांनी बाहेर काढली आणि अर्धी ज्योती मॅडमनी. त्यांनी माझ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला आहे. माझ्यासाठी ज्योती मॅडमच खूप मोठ्या आहेत. कारण त्यांनी मला इथपर्यंत आणलं. मी खेडेगावात राहत होते. मी एक ब्युटिशियन जरी असले तरी बोलण्याचे कौशल्य माझ्याकडे फारसे नव्हते. इथे येऊन जो कॉन्फिडन्स आलाय तो ह्या स्किल डेव्हलपमेंटमुळेच आलेला आहे.

ज्या मुली ट्रेनिंगला येतात त्यांना फारसं काही माहीत नसतं. ट्रेनिंगने त्यांच्यात जोपर्यंत कॉन्फिडन्स येत नाही तोपर्यंत आम्ही त्यांना परीक्षा देऊ देत नाही. जोपर्यंत त्यांना थियरी सांगता येत नाही, तोपर्यंत त्यांना आम्ही प्रॅक्टिकल करायला देत नाही.''

सावर्ड्यापासून ३-४ कि.मी. अंतरावर असलेल्या कुशिवडे या खेडेगावातून पूर्वा शिगवण ही दहावी शिकलेली मुलगी 'ब्युटी पार्लर'चे शिक्षण घेत आहे. ती रोज चालत जाऊन-येऊन कोर्स करीत आहे. ती सांगते, ''मला असं समजलं होतं की इथे खूप छान शिकवतात. मग मी इकडे जॉईन झाले. आपल्याला जर काही येत नसेल तर येथील मॅडम खूप छान समजावून सांगतात. आपल्याकडून जर काही चुका झाल्या तर त्या आपल्याला समजून घेतात. जर कोणती गोष्ट येत नसेल तर मॅडम म्हणतात की घाबरू नका. येत नसेल तर मला विचारा. मी परत सांगेन. मी इथे जॉईन झाले, तेव्हा या साऱ्याचा मला प्रत्यक्ष अनुभव आला. सगळ्यांचा खूप छान सपोर्ट आहे. मीसुद्धा खूप मनापासून इथे शिकते. मॅडमपण खूप मनापासून शिकवतात. मग मला असं वाटतं अजून काहीतरी शिकावं. माझा असा आत्ता विचार आहे की मी शिवणक्लाससुद्धा जॉईन करावा; इतका यांचा चांगला सपोर्ट आहे.''

कुडप या डेरवणलगतच्या गावातील सौ. सुखदा पाटणे या गृहिणी कौशल्य विकास केंद्राची प्रशासनिक व्यवस्था सांभाळतात. आपले अनुभव सांगताना त्या म्हणाल्या,''मी कुडपमध्ये राहते. लग्नाला पंधरा वर्षे झाली. ऑफिसचा असा काही अनुभव नव्हता. इथे जॉईन झाल्यानंतर चार कोर्सेस सुरू झाले आणि ते चारही



*निर्मितीचा आनंद आणि आर्थिक स्वावलंबनही !*



*प्रशिक्षणार्थी मुलींकडून बनविण्यात आलेल्या आकाशकंदिलांना मोठ्या प्रमाणात पसंती मिळाली आहे.*

कोर्सेस आपलेच आहेत असं म्हणून सुरुवात केली. मुलींच्या ॲडमिशन करायच्या, त्यांना समजावून द्यायचं. इथे राहून तुम्ही जर दोन कोर्सेस केले (उदा. ब्युटी पार्लर सोबत टेलरिंग), तर तुमच्यासाठी ते कशा पद्धतीने चांगलंच आहे; वगैरे.

वात्सल्य टीमकडून आपल्याला भरपूर मदत मिळते. ज्या काही आपल्याला अडचणी येतात त्यातून मार्ग निघतो. इथे जेव्हा सुरुवात झाली तेव्हा खूप अडचणी आल्या. पण सगळ्यातून मार्ग मिळत गेला. आता प्रत्येक कोर्समधून तीन ते चार बॅचेस बाहेर पडल्या आणि त्यांचा प्रतिसादपण खूप छान आहेत. मुलींची जी आपल्याकडे अटॅचमेंट झालेली आहे ती फारच सुंदर आहे. ज्योतीमॅडमनी खूप चांगलं सहकार्य केलं. आपल्याला काहीही अडचण आली तर मॅडम आहेत आणि त्यांच्याकडून आपणाला आधार मिळणार याची खात्री असते.

सकाळी दहा ते दुपारी एक ही वेळ ठरलेली आहे. बाहेरच्या जर जॉब करणाऱ्या कोणी मुली असतील तर जॉबमुळे त्यांना सकाळचा वेळ मिळत नाही. त्यांच्यासाठी दोन ते पाच ही वेळ ठेवलेली आहे. त्या वेळी ‘रीच’ अंतर्गत वस्तू बनविण्याचे काम सुरू असते.

इथे येऊन तोरण आणि कंदील हे आम्हाला शिकायला मिळालं. मुलींकडूनपण आम्ही करून घेतो आणि मुलींनाही आता त्याची आवड निर्माण झालेली आहे. आमची आत्तापर्यंत ६५० तोरणे विकून झालेली आहेत. ११६४ एन्व्हलप्स, २८१ आकाशकंदील, १८७ केळीची पाने, १३७ मोबाईल पाउच आणि अगदी नुकतेच तयार करायला सुरुवात केलेले प्रॉडक्ट –ज्वेलरीचे ३२ सेट्स विकले आहेत. आता अशी परिस्थिति आहे की ऑर्डर पूर्ण करण्यासाठी आम्हाला वेळ पुरत नाही. आता आपल्याकडे दहा ते बारा प्रॉडक्ट्स आहेत. तोरणे, लिफाफे, पाने, आकाशकंदील, बॅग तयार केलेल्या आहेत. अजूनही काही वस्तू बनविण्याच्या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरू आहेत.’’

प्रशिक्षणार्थींमध्ये काही थोड्या प्रौढ वयाच्या गृहिणी आहेत. त्यांना छोटीछोटी मुलं आहेत. त्यांना एक वाजेपर्यंत घरी जायला लागतं. मुलं शाळेतून घरी येतात किंवा घरचे काही प्रॉब्लेम्स आहेत. आपल्याकडे एक महिला प्रशिक्षणार्थी अशा आहेत की त्यांचा मुलगा अपंग आहे आणि त्यांची एक लहान मुलगीही आहे. त्या दोन वर्षाच्या मुलीला आंगणवाडीमध्ये घेऊन येतात. ती छोटी मुलगी तेथे बसत असते आणि या ट्रेनिंग पूर्ण करत आहेत. इथे खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण झाले आहे.

या गृहिणी उत्साहाने म्हणतात की आम्ही आता ॲडव्हान्स्ड कोर्ससुद्धा करणार! आम्हाला इथे यायला आवडतं. इथे त्यांचा खूप छान ग्रुप तयार झाला आहे. इथे त्यांना मोकळ्या वातावरणात शिकता येते.

आय.टी.ला आत्ता पाच ते सहा मुली आहेत आणि आठ कोर्सेस आहेत. डी.टी.पी., ॲडव्हान्स्ड टॅली, एक्सेल इ. ॲडव्हान्स्ड टॅली करून एक मुलगी ट्रस्टमध्येच नोकरीला लागली. सिव्हिल इंजिनीअरिंग झालेली एक मुलगी इथे होती. तिने बेसिक आणि ॲडव्हान्स्ड कोर्स केला आणि आता ती इथे ऑफिसला कामाला लागलेली. मी ॲडव्हान्स्ड आणि डिझायनर मेथडने शिकवते.

‘जनरल ड्युटी असिस्टंट’च्या पहिल्या बॅचला सहा मुली होत्या. ट्रस्टच्या रुग्णालयात त्यांना प्रत्यक्ष कार्यानुभव मिळाल्यामुळे त्यांचे प्रशिक्षण उत्तम झाले आहे आणि पहिली पूर्ण बॅच इथे नर्सिंगला लागली आहे. हॉस्पिटलमध्ये ‘स्टाफ’ म्हणून त्या रुजू झाल्या असून प्रगतीचा एक मार्ग त्यांच्यासाठी खुला झाला आहे.

वालावलकर रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयाच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील या ‘डेरवण कोहोर्ट’ आणि हा ‘कौशल्य विकास कार्यक्रम’ यातील दुवा उलगडून सांगताना म्हणाल्या, ‘‘ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलींचे आरोग्य सुदृढ व्हावे, त्या स्वावलंबी होऊन स्वतःच्या पायावर उभ्या राहाव्यात





*प्रशिक्षणार्थींनी तयार केलेली विविध आकर्षक तोरणे, हातपिशव्या इ.*

आणि एक साक्षर सक्षम स्त्री म्हणून कुटुंबाचा कार्यभाग सांभाळावा ह्या उद्देशाने 'डेरवण कोहोर्ट' ह्या उपक्रमाची मुहूर्तमेढ २०१९ साली रोवण्यात आली. उद्देश असा होता की तरुणींना प्रेरित करण्याबरोबरच त्यांच्या शरीरातील अनेमिया, लोहाची तसेच जीवनसत्त्वांची कमतरता, असंतुलित आहारामुळे प्रथिनांचा अभाव ह्यामुळे निर्माण होणारे कुपोषण हे ग्रामीण भागात वाढण्याऱ्या मधुमेहाचे कारण तर नाही ना हे शोधणे. म्हणजे ह्या सामाजिक उपक्रमाला शास्त्रीय किनार लाभली आहे. त्यामध्ये चिपळूण, संगमेश्वर, गुहागर तालुक्यातील जवळजवळ दीड हजार मुलींचा समावेश आहे. त्यांची सर्वांगीण तपासणी करून वजन, उंची, रक्तातले ४० घटक तपासले गेले आहेत. इतकेच नव्हे तर त्यांच्या आईवडिलांचीदेखील तपासणी मधुमेह आणि उच्च रक्तदाब मोजण्यासाठी केली आहे. आता दुसऱ्या टप्प्यात दरवर्षी त्याच्यातील बदलांची तपासणी केली जात आहे. पहिल्या टप्प्याचे आर्थिक नियोजन हे 'राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशन, महाराष्ट्र शासन' यांनी केले आहे तर दुसरा टप्पा हा 'रमा पुरुषोत्तम फाउंडेशन'च्या सौजन्याने प्रगती करीत आहे. ह्या पाच वर्षात किशोरवयीन मुली वयात येऊन काही विवाहित झाल्या आहेत आणि कित्येक प्रसूत झाल्या आहेत. ह्या सर्व टप्प्यांवर तिला आरोग्यदायी ठेवण्यासाठी वालावलकर रुग्णालयाने हातभार लावला आहे. हे सर्व कार्यान्वित करताना एक महत्त्वाची बाब म्हणजे मुलींना शारीरिक कष्ट, असंतुलित आहार आणि आर्थिक पाठबळाचा अभाव याला सामोरे जावे लागत आहे आणि त्याचा दूरगामी विपरीत परिणाम तिच्या स्वतःच्या आणि पुढे तिच्या बाळाच्या आरोग्यावर होऊ शकतो. आणि यामुळे नुसती औषधे पुरवून भागणार नाही तर तिला स्वावलंबी करणे गरजेचे आहे. तिच्यातल्या कला गुणांना वाव देऊन ते जोपासण्याची आवश्यकता आहे; जेणेकरून ती स्वतः आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल, चांगलं अन्न खाऊ शकेल, आजार तिच्यापासून दूर पळतील. आणि म्हणूनच 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'ने अशा मुलींसाठी हे कौशल विकासाचे दालन उभे केले आहे

हे कौशल्य विकास केंद्र भारत सरकारच्या 'केंद्रीय कौशल्य विकास केंद्रा'शी संलग्न आहे. याद्वारे मुलींना ब्युटी पार्लर कोर्स, फॅशन डिझायनिंग, आयटी, नर्सिंग असिस्टंट असे शिक्षण दिले जात आहे आणि कोर्स पूर्ण झाल्यावर तिला ताबडतोब नोकरीच्याही संधी उपलब्ध होत आहेत. हे करत असताना तिच्या आहाराकडे पूर्ण लक्ष केंद्रित करून पौष्टिक लाडू, कुकीज असे पदार्थ खाऊ घालणं आणि तयार करणे आणि विकणे याचेही प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

लहान मुले आणि किशोरी मुलीचे आरोग्य हा कायमच केंद्रभागी असलेला विषय आहे. ह्याचे मुख्य कारण ग्रामीण भागात पोषक आहाराची उदाहरणार्थ पालेभाज्या, फळे, प्रथिने, दूध-तूप यांची कमतरता आणि आर्थिक अक्षमता. याचा परिणाम मोठेपणी शरीरातील जीवनसत्त्वे, व्हिटॅमिन डी, बी-१२, कॅल्शियम यांचा साठा अपुरा होणे आणि हाडे कमकुवत असणे आणि मधुमेहसारख्या आजाराची लागण होणे ह्यात होऊ शकते. आणि म्हणूनच मुलांची 'आरोग्यधनसंपदा' अबाधित ठेवणं हे प्राधान्य मानून वालावलकर रुग्णालयाच्या टीमने एनर्जी आणि कॅल्शियमयुक्त अशी 'मॉर्निंग मिस्ट' नावाची बिस्किटे तयार केली आहेत. विशेष म्हणजे यात मैदा आणि कोणत्याही प्रिझर्वेटिव्हचा वापर टाळला आहे आणि पौष्टिक अशी नाचणी, डाळी असे कॅल्शियम आणि प्रथिनयुक्त घरगुती पदार्थ वापरून बिस्कीट तयार केले आहे. याशिवाय ते चवीला अतिशय स्वादिष्ट असून कॅलरीजने परिपूर्ण आहे. किंबहुना ज्यांचा सकाळचा नाष्टा म्हणजे फक्त कोरा चहा आणि बटर असा असतो त्या मुलांसाठी हे 'मॉर्निंग मिस्ट' बिस्कीट उत्तम पर्याय आहे. मुलांच्या आवडी निवडी लक्षात घेऊन त्यात कोको, चॉकलेट असे स्वाद समाविष्ट करून ते अधिक चविष्ट आणि पौष्टिक झाले आहे. इतकेच नव्हे तर ह्या बिस्किटांच्या उत्पादनापासून ते विक्रीपर्यंतचे तांत्रिक शिक्षण तरुण पिढीला देऊन व्यवसायाभिमुख प्रशिक्षण



*मॉर्निंग मिस्ट कूकीजचे उद्घाटन करताना श्री. कमलेश जोशी, सोबत डॉ. ज्योती अय्यर, डॉ. नेताजी पाटील आणि अन्य*




*एनर्जी आणि कॅल्शियमयुक्त मॉर्निंग मिस्ट कूकीज*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

देण्याचाही ट्रस्टचा मानस आहे, जेणेकरून तरुण मुले-मुली लहान स्तरावर व्यवसाय सुरू करू शकतील आणि उत्पन्नाचे साधन निर्माण होऊन आरोग्यही सुधारेल. आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे हल्लीच्या आवडत्या 'जंक-फूड'साठी 'मॉर्निंग मिस्ट' बिस्किट्स हा एक उत्तम पर्याय आहे.

प्रशिक्षणार्थी मुलींवरचा कामाचा आणि प्रवासाचा ताण कमी व्हावा म्हणून त्यांची रहिवासाची व्यवस्थादेखील वसतिगृहात नाममात्र रुपये पंचवीस एवढे शुल्क घेऊन केली जाते. निवास, दोन वेळचे भोजन, न्याहरी, अल्पोपहार, चहा यासाठी रोजचा खर्च सुमारे तीनशे रुपये असताना, ट्रस्टने प्रत्येक मुलीसाठी दररोजचा पावणे तीनशे रुपयांचा खर्चाचा भार केवळ त्या मुलींना हे प्रशिक्षण घेणे शक्य व्हावे आणि त्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी या उद्देशाने अंगावर घेतला आहे. या सर्वांचा दूरगामी परिणाम किशोरवयीन मुलींचे शारीरिक, मानसिक, सामाजिक आरोग्य सुधारण्यास होणार आहे. शिवाय कुपोषणमुक्त झाल्यामुळे मधुमेह, रक्तदाब सारखे आजार तिच्यापासून दूर पळतील आणि पुढच्या पिढीलाही त्यापासून मुक्ती मिळेल असा विश्वास आम्हाला आहे.''

'बलशाली भारत' हे श्रीसहजानंदसरस्वती स्वामी महाराज यांनी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टची स्थापना करताना पाहिलेले स्वप्न आहे. स्त्री सुखी, समाधानी, सुदृढ, आरोग्यसंपन्न असेल तर भावी पिढीसुद्धा तशी होईल आणि समाज बलशाली होईल. यासाठी ट्रस्टने खास स्त्रियांसाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. स्त्रीवर्गाचे आरोग्य उत्तम राहावे यासाठी ट्रस्ट रुग्णालयाद्वारे विविध प्रकारे काम करीत आहेच, पण तिला स्वावलंबी आणि सक्षम करण्यासाठी 'कौशल्य विकास केंद्रा'द्वारे जे कार्य सुरू केलेले आहे त्यामुळे बलशाली समाजाचे श्रीमहाराजांचे स्वप्न नक्कीच साकार होणार आहे.

### *डॉ. ज्योती अय्यर यांचा बायोडेटा*

*डॉ. ज्योती अय्यर या जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील नामवंत संशोधक आहेत. त्या १९९५ ते १९९८ या काळात Meyer Organics Pvt. Ltd. या कंपनीत Formulation development या क्षेत्रात काम करीत होत्या. जानेवारी २००५ ते जानेवारी २०२२ या काळात त्या BIOCON या नामवंत कंपनीत विविध पदांवर कार्यरत होत्या. तेथे त्यांनी जागतिक दर्जाचे जैविक औषध विकसित करणाऱ्या समूहाचे नेतृत्व केले. या औषधाला FDA; EMA, Canada, Brazil आदींची मान्यता मिळाली आहे. Biofusion Therapeutics (BIOCON subsidiary) या कंपनीतही त्या Vice President, Head of Product Development या पदावर कार्यरत होत्या. BIOCON मध्येच चाळीसाहून अधिक शास्त्रज्ञांचा एक Purification Group तयार करून त्यांनी त्याचे नेतृत्व केले आहे.*

*त्यांची शैक्षणिक गुणवत्ता :*

**PhD (Tech); Fermentation Technology, UDCT, Mumbai Univ. (2000 –'04)*
**MTech: Bioprocess Technology, UDCT, Mumbai Univ. (1998-'00) Gold Medalist – University Topper*
**Bachelor of Pharmacy, KMKCP, Mumbai University (1991 –'95)*
**Short- courses in Management from IIM, Bangalore (2006 & 2018)*
**Recipient of several educational scholarships*

*२०२२पासून त्या भ.क.ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्रात वरिष्ठ शास्त्रज्ञ या पदावर कार्यरत असून ट्रस्टच्या कौशल्य विकास केंद्राच्या संयोजक म्हणून काम पाहात आहेत.*

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०